# महाराष्ट्र शासन
# कला संचालनालय

सर ज.जी.कला महाविद्यालय आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई - ४०० ००१. दुरध्वनी क्र.२२६२०२३१/३२


**क्रमांक — परिपत्रक/ डिओओ/२०१७-१८/चार/८३४** **दिनांक :- २८.०६.२०१८**

## परिपत्रक

महाराष्ट्र शासनाच्या वतीने या संचालनालयामार्फत प्रतिवर्षीप्रमाणे शासकीय रेखाकला परीक्षा २०१८ चे आयोजन माहे सप्टेंबर मध्ये करण्यात आलेले आहे. परीक्षानिहाय वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे. आपला केंद्र क्रमांक आपल्या निकालपत्रकांवर,उत्तरपत्रिका बंडल तसेच परीक्षा संबंधी कागद पत्रांवर व दैनंदिन टपाल यावर ठळक लाल शाईने उल्लेख करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| **एलिमेंटरी ग्रेड परीक्षा :** | **गुरुवार दि.२७ सप्टेंबर २०१८** | **१०.३० ते १.००** | **वस्तुचित्र** |
| | | **२.०० ते ४.००** | **स्मरणचित्र** |
| | **शुक्रवार दि. २८ सप्टेंबर २०१८** | **१०.३० ते १.००** | **संकल्पचित्र नक्षिकाम** |
| | | **२.०० ते ४.००** | **कर्तव्य भूमिती व अक्षरलेखन** |
| **इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा :** | **शनिवार दि.२९ सप्टेंबर २०१८** | **१०.३० ते १.३०** | **स्थिरचित्र** |
| | | **२.३० ते ४.३०** | **स्मरण चित्र** |
| | **रविवार दि.३० सप्टेंबर २०१८** | **१०.३० ते १.३०** | **संकल्पचित्र नक्षिकाम** |
| | | **२.३० ते ५.३०** | **कर्तव्य घनभूमिती व अक्षरलेखन** |

२. **परीक्षा** फॉर्मस सहभागी शाळांकडून/ विद्यार्थ्यांकडूनभरुन घेण्यासाठी तसेच संबंधित निकालपत्रके व परीक्षा फी या कार्यालयात पाठविण्याच्या तारखा खालीलप्रमाणे आहेत.

**अ)** सहभागी शाळांनी/ विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्राकडे अर्ज करण्याची अंतिम तारीख : **शुक्रवार दि. २७ जुलै, २०१८.**

**ब)** केंद्रांनी परीक्षा नियंत्रक , कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे निकालपत्रके दोन प्रतित सीडीसह, व परीक्षा फी सादर करण्याची अंतिम तारीख : **शुक्रवार दि. ०३ ऑगस्ट, २०१८.** एलिमेंटरी व इंटरमिजिएट शासकीय रेखाकला परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| | परीक्षा | महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी | महाराष्ट्रा बाहेरील राज्यातील विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|---|---|
| १) | एलिमेंटरी | रुपये ५०/- | रुपये १००/- |
| २) | इंटरमिजिएट | रुपये १००/- | रुपये २००/- |

**क)** दरवर्षीप्रमाणे आकस्मिक खर्चापोटी देय असलेली रक्कम रु.२०/- प्रती विद्यार्थी कपात करुन उर्वरित शुल्क **कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (Director, Directorate of Art. M.S., Mumbai)** यांच्या नांवे धनादेशाव्दारे (D.D.) आकस्मिक खर्चाच्या रोख रक्कमेच्या पावतीसह या कार्यालयात पाठविण्यात यावे. केंद्र प्रमुखांनी परीक्षा प्रवेश संबंधीची कार्यवाही त्वरीत सुरु करुन तसेच प्रवेशाची अंतिम तारीख कळविणारे परिपत्रक आवश्यक त्या फॉर्मसह सहभागी शाळांना पाठविण्याची व्यवस्था करावी. त्याचप्रमाणे प्रवेशाच्या अंतिम तारखेस नोटीस बोर्डवरही ठळक अक्षरात प्रसिध्दी देण्यांत यावी.

**३.ओळखपत्राबाबत महत्वाची सूचना :-** शासकीय रेखाकला परीक्षांकरीता प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना ओळखपत्र विहित नमुन्यात फोटोसहित त्यांच्या शाळेच्या मुख्याध्यापकांच्या सही शिक्का असलेले दोन प्रतीत तयार करावे . त्याची एक प्रत केंद्रप्रमुखांनी स्वत:कडे ठेवावी व दुसरी प्रत केंद्र प्रमुखांनी त्यावर सही करुन विद्यार्थ्यांस परत करावी, की जी संबंधित विद्यार्थ्यांने प्रत्यक्ष परीक्षेच्या कालावधीत स्वत:जवळ ठेवावयाची आहे.

**४. विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना :-** या संचालनालयाच्या असे निदर्शनास येते की, शासकीय रेखाकला परीक्षेची निकालपत्रके या कार्यालयात विहित मुदतीत सादर केल्यानंतर किंवा परीक्षेच्या ऐनवेळी जादा विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतात. अशा प्रकारच्या अपवादात्मक परिस्थितीत परीक्षेत थेट प्रवेश न देता. या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी. याची नोंद घ्यावी.

**५.निकालपत्रक संगणकीकृत तयार करताना घ्यावयाची दक्षता :-** एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षांच्या विदयार्थ्यांच्या नावांची यादी सोबतच्या नमुना फॉर्म नुसार लिगल साईज मध्ये तयार करण्यात यावी. तसेच नावांची यादी मायक्रोसॉफ्ट एक्सेल, TIMES NEW ROMAN १२ Pt. इंग्रजी कॅपिटल अक्षरामध्ये तयार करण्यात यावी. तसेच एका पानावर केवळ २० विद्यार्थ्यांची नावे टंकलिखीत करावीत.

**६. निकालपत्रकात समाविष्ट विदयार्थ्यांची नांवे व माहिती सी.डी. स्वरुपात पाठविण्याबाबत :-** एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षेच्या विदयार्थ्यांची तयार करण्यात आलेली यादी, मायक्रोसॉफ्ट एक्सेल फाईल केंद्र क्रमांक , परीक्षा वर्ष व परीक्षेचे नांवे सेव्ह करुन ,या कार्यालयात पाठविण्यात यावी. सी.डी. वर केंद्र क्रमांक, परीक्षा वर्ष, व परीक्षेचे नांव यांचा उल्लेख करण्यात यावा.

७. विहीत मुदतीत निकालपत्रके व परीक्षा फी या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व अशा केंद्रांचे विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ होऊ न शकल्यास तसेच याप्रकरणी कोणताही पेचप्रसंग उद्वल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत केंद्राची / शाळेची राहील तसेच उशिरा प्राप्त होणा-या अर्जांची कोणतीही दखल या कार्यालयाकडून घेण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी. परीक्षेसंबंधी आवश्यक असणारे नमुने (प्रवेश पत्र, आकस्मीक खर्च पावती व इतर) www.doa.org.in या संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेण्यात यावे.

(सुरेश म. पवार)
प्र.परीक्षा नियंत्रक,
कला संचालनालय,महाराष्ट्र राज्य,
मुंबई.

प्रति,
सर्व शासकीय रेखाकला परीक्षा केंद्रे.
प्रत, निवड नस्ती.